पुण्य नगरी

# विभागीय आयुक्त करणार 'हर घर संविधान' कार्यक्रमाचा शुभारंभ

**सामाजिक न्यायभवन येथे कार्यक्रम**

**नागपूर :** भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त 'हर घर संविधान' कार्यक्रमाची सुरुवात संविधान दिनाचे औचित्य साधून मंगळवार, २६ नोव्हेंबर रोजी करण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सकाळी ७.३० वाजता नागपूर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्याहस्ते या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

भारतीय राज्यघटनेबाबत जागरुकता, राष्ट्रीय एकात्मतेची भावन, उपेक्षित घटकातील समुदायांमध्ये त्यांच्या घटनात्मक अधिकारी व कर्तव्याबाबत साक्षरता आदीबाबत संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त हर घर संविधान उपक्रम २६ नोव्हेंबर पासून पुढील प्रत्येक वर्षी साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जि.प.चे सीईओ विनायक महामुनी, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले, अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे यांच्यासह समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त बाबासाहेब देशमुख, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे उपसंचालक विजय वाकुलकर, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त डॉ. मंगेश वानखेडे, संशोधन अधिकारी आशा कवाडे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी किशोर भोयर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन समाजकल्याण विभागाच्या साहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

Nagpur Edition
Nov 26, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com